समाजासाठी काम करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था समाजात कार्यरत आहेत पण आपल्या वेगळेपणाने व अत्यंत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करणारी संस्था म्हणजे वात्सल्य सामाजिक संस्था होय.

## संस्थेची सामाजिक कार्ये






# एकल महिला

समाजातील विधवा, परित्यक्ता, अनाथ अशा एकल महिलांसाठी कोरोनाच्या महामारीत काहीतरी केले पाहिजे म्हणून महिलांनी महिलांसाठी ही संस्था सुरू केली.एकल महिलांचे प्रश्न,जगण्यासाठी करावी लागणारी धडपड,स्वाभिमानी जीवन जगण्याचे मार्ग अशा मूलभूत प्रश्नावर तुळजापूर आणि परिसरातील ३०२ एकल महिलांमध्ये संस्थेचे कार्य आहे. या महिलांना कुक्कुटपालन,गांडूळ खत,शिलाई मशीन,शेळीपालन, इ,प्रकारच्या व्यवसायासाठी मदत करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे.





# गोशाळा

भारतीय संस्कृतीमध्ये गोमातेला अनन्य साधारण महत्त्व आहे.गोमातेपासून आपणास असंख्य प्रकारचे फायदे होतात.पण सध्याची परिस्थिती पाहता देशी गायींची संख्या झपाट्याने कमी होत आहे.हाच विचार करून संस्थेने देशी गाईंची गोशाळा सुरू केली आहे.संस्था विशेषतः भाकडगाई,अपंग आजारी इ,प्रकारच्या गाईंचा सांभाळ करते.






# पर्यावरण रक्षण

निसर्गाने मानवाला भरभरून दिले आहे.पण माणूस निसर्गाला काहीच देत नाही,हा विचार करून वात्सल्य संस्थेने मंगरूळ येथील केंद्रात वनराई-देवराई उभा करून निसर्गातील जीव जंतू,कीटक पशुपक्षी यांना जंगल अधिवास देण्याचा प्रयत्न केला आहे.असंख्य पशु पक्षांना इथे हक्काचा निवारा मिळाला आहे





## सार्थक दिवाळी उपक्रम

दिवाळी हा आपल्या देशामध्ये मोठ्या हर्षोल्लासात साजरा केला जातो.पण समाजामध्ये भटके विमुक्त,गरजू,वंचित समाज बांधव आर्थिक अडचणीमुळे दिवाळी साजरी करू शकत नाहीत.अशा सर्व घटकांसाठी वात्सल्य दरवर्षी सार्थक दिवाळी अभियान राबवते यामध्ये गरजवंतांना कपडे,फराळ दिला जातो.






# अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व

समाजामध्ये अनेक अभ्यासू मुले असतात,पण परिस्थितीमुळे त्यांना अर्धवट शिक्षण सोडावे लागते,वात्सल्य संस्था अशा २३ मुला-मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सर्व प्रकारचे शैक्षणिक पाठबळ देते,यामध्ये वस्तीगृह,शैक्षणिक साहित्य, शैक्षणिक प्रवेश फी चा समावेश आहे.त्याशिवाय आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींनाही वात्सल्य मदत करते.






वात्सल्य
सामाजिक संस्था
किरण आशेचा, वेध आकाशाचा

# ग्रंथालय

ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार,आवश्यक पुस्तके मिळत नसल्याने मागे राहतात, हा विचार करून वात्सल्यने स्पर्धा व इतर सर्व परीक्षांमध्ये या मुलांना पुस्तकाविना यश मिळाले नाही ही भावना येऊ नये म्हणून सुसज्य ग्रंथालयाची निर्मिती केली आहे.यामुळे मुलांसोबतच सर्व प्रकारच्या वयोगटातील व्यक्तींना पुस्तके वाचता यावीत म्हणून ग्रंथालयाची निर्मिती केली आहे.






# आरोग्य सेवा

सध्या मनुष्याच्या जीवनशैलीमुळे अनेक आजार उद्भवत आहेत,शिवाय वृद्ध लोकांची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.म्हणून वात्सल्य संस्था आरोग्य विभाग चालवते. यात सुसज्ज ॲम्बूलन्स चा समावेश आहे.शिवाय गरजूंना गोळ्या औषधे पुरवणे, ठिकठिकाणी आरोग्य शिबिर घेणे हे उपक्रम वात्सल्य संस्था सातत्याने चालवते.






## स्वच्छता अभियान

माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत-स्वच्छ अभियान अंतर्गत वात्सल्य सातत्याने स्वच्छता मोहीम राबवून स्वच्छतेची जागृती करत आहे.जेणेकरून मानवाचे आरोग्य सुदृढ राहावे व आजार होऊ नयेत.





## सेंद्रिय शेती जागृती अभियान

सेंद्रिय शेती जागृती अभियान रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे शेतकऱ्यांसमोर संकटे उभी राहत आहेत.त्यामुळे आरोग्यावर परिणाम होत आहे.हा विचार करून वात्सल्य संस्था सेंद्रिय शेती वापर जागृती कार्यशाळा घेते.यात सेंद्रिय शेती विषयातील तज्ञ व शेतकरी यांच्या संवादातून या विषयाची व्याप्ती वाढत आहे.






वात्सल्य सामाजिक संस्था

## कोरोना महामारी मदत

मानवावर कोरोना महामारीमुळे मोठे संकट आले होते.या काळात वात्सल्य संस्थेने सातत्याने आरोग्याची जागृती करून औषधोपचार वाटप केला.त्याशिवाय गरजू,वंचित महिलांना ५०० राशन किटची मदत केली.





## वृक्ष लागवड व संगोपन

मानवी हस्तक्षेपामुळे,लोकसंख्या वाढल्यामुळे माणूस निसर्गाच्या प्रत्येक गोष्टीवर अतिक्रमण करत आहे.कोरोनाच्या काळात ऑक्सिजन अभावी अनेकांचे प्राण गेले, यामुळे वात्सल्य वर्षाचे बाराही महिने वृक्ष लागवड व संगोपनाची मोहीम हाती घेत असते.असंख्य दुर्मिळ देशी वृक्ष लावून व उत्तम संगोपन करून संस्था पर्यावरणाचा समतोल राखण्याचा प्रयत्न करत आहे





## जलसंधारण

सध्या पावसाचे अत्यल्प प्रमाण पाहता आहे त्या पाण्याचा वापर योग्य करणे व पाण्याची बचत करणे हे मोठे आव्हान आहे.हा विचार करून वात्सल्य अनेक ग्रामीण भागात जलसंधारण,नाला सरळीकरण ही कामे हाती घेत आहे.ज्यामुळे पाणी मुरेल व शेतकऱ्यांना याचा फायदा होईल



